सन २०१९-२० मधील अर्थसंकल्पीत
तरतूदीचे वितरण करणेबाबत.
छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान
योजना-२०१७ (राज्यस्तर) (२४३५ ००८२).

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र. अर्थसं- ०५१९ /प्र.क्र.७१/२-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९

वाचा :-

१. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.१२७/२-स दि. २८.६.२०१७, दि. ८.९.२०१७, दि.७.१२.२०१७, दि.२८.०२.२०१८, दि.३१.०३.२०१८, दि.१६.०४.२०१८व दि.२.०५.२०१८

२. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन शु द्धीपत्रक क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.१२७/ २-स, दि. ०५.७.२०१७, दि.२०.०७.२०१७ व दि.१२.१२.२०१७

३. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०४१८/ प्र.क्र. ५३/२-स, दि. ९.०५.२०१८, दि.५.०६.२०१८

४. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन परिपत्रक क्रमांक कृकमा ०४१८/ प्र.क्र. ५३/२- स, दि. २१.०५.२०१८

५. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन परिपत्रक क्रमांक कृकमा ०७१८/ प्र.क्र. ११८/ २- स, दि. १०.०८.२०१८

६. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन परिपत्रक क्रमांक कृकमा ०६१८/ प्र.क्र. १०६/ २- स, दि. २९.०९.२०१८, दि.१९.१२.२०१८, दि.८.०३.२०१९ व दि.२५.०६.२०१९

७. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन परिपत्रक क्रमांक कृकमा १०१८/ प्र.क्र. १५५/ २- स, दि. १३.०२.२०१९

८. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा. प्रशा - ५, दि.१०.५.२०१६

९.वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७

१०. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०.६.२०१७

११. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.पूरक २०१७/प्र.क्र.१२९/अर्थ ३, दि.१८.८.२०१७

१२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.१.०४.२०१९

१३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९

१४. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक अर्थसं-०५१९/ प्र.क्र.७१/२-स, दि. १४.०५.२०१९, दि.१५.०५.२०१९

१५. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०४१९/ प्र.क्र. ६२/२-स, दि.१०.०६.२०१९

१६. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०५१९/ प्र.क्र. ७७/२-स, दि.३०.०७.२०१९

<u>प्रस्तावना:-</u>

राज्यामध्ये सन २००९-१० पासून असलेल्या सततच्या दुष्काळ व नापिकीमुळे कर्जबाजारी झालेल्या शेतक-यांना दिलासा देण्यासाठी दि.२४.६.२०१७ च्या मंत्रीमंडळ बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार शासन निर्णय दि. २८.६.२०१७ अन्वये “छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७” घोषित करण्यात आलेली आहे. तसेच त्यामध्ये संदर्भाधीन शासन निर्णय/ शासन शुध्दीपत्रान्वये वेळोवेळी बदल करण्यात आला आहे. तद्नंतर सदर योजनेचा अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ मिळावा या दृष्टीने वरील वाचा येथे नमूद केलेल्या १ ते ७ येथील सहकार विभागाच्या शासन निर्णय व शुद्धीपत्रकान्वये वेळोवेळी या योजनेत बदल करण्यात आला आहे.

२. “छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७” (राज्य स्तर) (२४३५ ००८२)” या योजनेच्या अंमलबजावणीसाठी बाबनिहाय खर्चाकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी रु. ४०५.६२ कोटीची मुळ तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. तसेच ३३-अर्थसहाय्य अंतर्गत पुरवणी मागणीद्वारे रु.२५०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे सदर योजनेंतर्गत आता एकूण रु.२९०५.६२ कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद आहे. सदर एकूण तरतूदीपैकी ३३-अर्थसहाय्य या उद्दिष्टाखाली संदर्भ क्र. १४ येथील सहकार विभागाच्या शासन निर्णय व शुद्धीपत्रकान्वये रु.१३३ कोटी, संदर्भ क्र. १५ येथील शासन निर्णय व शुद्धीपत्रकान्वये रु.१५२ कोटी व संदर्भ क्र. १६ येथील शासन निर्णयान्वये रु. ५७७ कोटी इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे. “छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७” (राज्य स्तर) (२४३५ ००८२)” या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतुदीमधून १०- कंत्राटी सेवा, १३- कार्यालयीन खर्च व २८- व्यावसायिक सेवा अंतर्गत काही निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील सन २०१९-२० या आर्थिक वर्षात "छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ (राज्य स्तर) (२४३५ ००८२) " योजनेंतर्गत मंजूर निधीपैकी वितरित निधी वगळता या योजनेच्या अंमलबजावणीसाठी बाबनिहाय खर्चाकरिता रु. ४२.९१ लाख (रुपये बेचाळीस लक्ष एक्याण्णव हजार फक्त) खालील तक्त्यात नमूद बाब/ उद्दिष्टनिहाय निधीचे वितरण करुन खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

(रुपये लाखात)

अ. क्र.	मुख्य लेखाशिर्ष	उद्दीष्ट	मुळ तरतूद	वितरणासाठी प्रस्तावित निधी
१	**२**	**३**	**४**	**५**
१	२४३५००८२	१०- कंत्राटी सेवा	१.००	**०.६०**
२		१३- कार्यालयीन खर्च	१०.००	**२.८०**
३		२८- व्यावसायिक सेवा	१००.००	**३९.५१**
			१११.००	**४२.९१**

२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा-५, दि.१०.०५.२०१६ मधील परि. अ नुसार नमूद केलेल्या सर्व बाबींची पूर्तता होत असून या प्रकरणी खालीलप्रमाणे माहिती आहे.

१. महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम, २०१९, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९ अन्वये उपरोक्त बाबींखाली खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले आहेत.

२. मंजूर निधी :- या योजनेसाठी सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी एकूण रु. ४०५.६२ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित असून पुरवणी मागणीद्वारे रु.२५०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. आता एकूण २९०५.६२ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद आहे.

३. ज्या लेखाशिर्षाखाली अनुदान वितरीत करण्यात येत आहे त्या लेखाशिर्षांतर्गत १ वर्षापासूनचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. :- लागू नाही.

४. स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देताना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यात आली आहे :- लागू नाही.

५. वैयक्तिक लाभार्थींचे देयक सादर करताना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे :- लागू नाही.

६. बांधकाम विषयक प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देताना सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात करावा. :- लागू नाही.

७. खरेदीविषयक प्रक्रिया अद्ययावत संबंधित शासन आदेशानुसार करावी व तसा उल्लेख प्रशासकीय मान्यतेत असावा :- लागू नाही.

८. साहित्य खरेदीची रक्कम पुरवठादाराच्या नावे ECS द्वारे आहरित करावी :- लागू नाही.

३. सदर तरतूद खर्च करण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच लेखाधिकारी, अधिन सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर निधी आहरण करुन हा खर्च वेळेत होईल हे सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पहावे. तसेच या बाबतचा अहवाल व खर्चाची माहिती वेळोवेळी शासनास पाठवावी.

४. वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेला निधी संबंधित बँका/ संस्थांस वितरित करताना आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर रकमेबाबत उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्याची प्रत शासनास सादर करावी.

५. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाने वित्त विभागाच्या उपरोक्त वाचा क्र. ८ ते १३ येथील शासनपरिपत्रकामधील सूचनांचे पालन करावे.

६. सदरहू रक्कम मागणी क्रमांक व्ही- २, २४३५-- इतर कृषिविषयक कार्यक्रम, ००, ६० - इतर, १०१ -- शेतक-यांच्या कर्ज माफीसाठी योजना, (००)(०१) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना- २०१७ (राज्य स्तर) (२४३५ ००८२) (दत्तमत) या लेखाशिर्षाखालील खालील बाबींसाठी सन २०१९-२० या वर्षासाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून खर्च करण्यात यावा.

१०- कंत्राटी सेवा

१३- कार्यालयीन खर्च

२८- व्यावसायिक सेवा

७. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारांतर्गत निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१८१८५७५१६३०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Cooperation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, serialNumber=b9bf7a534d8f1272bd902482bf95b556a5baefdddce18574a78fa2d8d0957d1f, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2019.09.18 19:03:51 +05'30'

(रमेश शिंगटे)

अवर सचिव व सहनिबंधक, सहकारी संस्था,

महाराष्ट्र राज्य

प्रत:-

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. महालेखाकार, महाराष्ट्र- १, मुंबई.
३. महालेखाकार, महाराष्ट्र- २, नागपूर.
४. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था.
५. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
६. वित्त विभाग, व्यय-२/अर्थसंकल्प -१३ ,मंत्रालय, मुंबई
७. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. कोषागार अधिकारी, पुणे.
९. अवर सचिव (कार्यासन १७ स), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय
१०. निवड नस्ती-२-स.